# मॅन इंडस्ट्रीजने शेअरधारकांसाठी जाहीर केला ४० टक्के लाभांश

**मुंबईः मॅन इंडस्ट्रीज लिमिटेड या देशातील आघाडीच्या मोठ्या व्यासाच्या पाईप निर्मात्या कंपनीने ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात सुमारे ९१.९६ कोटी रुपयांचा नफा झाला असून, यापूर्वीच्या आर्थिक वर्षात कंपनीला ६७.०९ कोटी रुपयांचा नफा झाला होता. आता त्यात ६७.०७ टक्के वाढ झाली.**

या वाढीव नफ्यानंतर कंपनीने आपल्या शेअरधारकांना लाभांश देण्याचा निर्णय घेतला असून, शेअरधारकांना ४० टक्के लाभांश देण्यात येणार आहे. यापूर्वी कंपनीने ३५ लाभांश दिला होता. या आर्थिक वर्षात कंपनीन१६३१.४३ कोटी रुपयांची उलाढाल केली असून, त्यात ९.४५ टक्के वाढ झाली. यापूर्वीच्या आर्थिक वर्षात कंपनीची १५२४.२९ कोटी रुपयांची उलाढाल झाली होती.

२३ व्या वार्षिक महासभेत शेअरधारकां समोर बोलताना मॅन इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष आर. सी. मनसुखानी म्हणाले की, गेल्या दोन वर्षात अर्थव्यवस्थेची आणि उद्योगक्षेत्रातील परिस्थिती आव्हानात्मक होती. त्यातही कंपनीने उत्तम प्रदर्शन करुन आपली क्षमता आणि सामर्थ्य सिद्ध करुन दाखविले आहे. यावर्षी ही कंपनीला चांगले कंत्राट मिळण्याची आशा आहे. आतापर्यंत कंपनीने १५०० कोटी रुपयांच्या ऑर्डर बुक केल्या आहेत.

या वर्षी महासभेने जे. सी. मनसुखानी यांची २३ नोव्हेंबर २०११ पासून उपाध्यक्ष आणि व्यवस्थापक म्हणून पुर्ननियुक्ती करण्यास आणि निखिल मनसुखानी , ए. व्ही. राममूर्ती आणि पि केटनडन यांची अतिरिक्त संचालक म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी दिली आहे. कंपनीचे कार्यकारी संचालक जे. एल. मनसुखानी यांचे ३१ ऑक्टोबर २०११ रोजी निधन झाल्याची दुःखद माहितीही कंपनीने शेअरधारकांना यावेळी दिली. एफसीसीबीचे काम २३ मे २०१२ पर्यंत पूर्ण करण्यासाठी निधी उभारण्याची परवानगी कंपनीने शेअरधारकांकडून घेतली आहे.